स्वागत

## श्री. सुब्रत रथो महानिर्मितीचे नवे व्यवस्थापकीय संचालक



राज्याच्या वीजनिर्मिती क्षेत्रात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (महानिर्मिती) च्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार मा.श्री.सुब्रत रथो यांनी नुकताच स्वीकारला आहे. ते भारतीय प्रशासकीय सेवेतील (महाराष्ट्र कॅडर-सन १९८६ बॅच) अधिकारी आहेत. २ फेब्रुवारी २००९ रोजी कंपनीच्या प्रकाशगड मुख्यालय येथे त्यांनी मा.श्री.अजय मेहता यांचेकडून ही सूत्रे स्वीकारली. श्री.रथो यांना राज्याच्या वीजक्षेत्राची उत्तम जाण असून यापूर्वी एमएसईबी होल्डींग कंपनी आणि महापारेषणचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून त्यांनी लक्षणीय कामगिरी बजावली आहे.

त्यांनी जवाहरलाल नेहरु विद्यापीठातून 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून लातूर, नांदेड, बुलढाणा आणि गडचिरोली इत्यादी जिल्हयांमध्ये वेगवेगळया महत्वपूर्ण पदांवर भरीव कामगिरी केली आहे. माजी राज्यपाल मा.डॉ.पी.सी. अलेक्झांडर यांचे 'उपसचिव' म्हणून कार्य करताना त्यांनी प्रादेशिक विकास मंडळ अंतर्गत राज्यातील विविध मागास भागाचा विकास अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीकोनातून मोलाची कामगिरी बजावली आहे.

यापूर्वी भारत सरकारच्या विदेश व्यापार विभाग मुंबई कार्यालयाचे 'महासंचालक' म्हणून कार्यभार असताना त्यांनी महाराष्ट्र, गुजरात आणि मध्यप्रदेश येथील वस्तुंच्या निर्यातीकरिता मोठया प्रमाणात प्रोत्साहन दिले. तसेच त्यांनी साडेतीन वर्षे बृहन्मुंबई महानगर पालिकेत 'अतिरिक्त आयुक्त' म्हणून देखील काम पाहिले आहे. अनुभवसंपन्न व्यक्तिमत्वाचे श्री.रथो हे कुशल संघटक, उत्कृष्ट प्रशासक आहेत.

## मा. श्री. अजय मेहता यांना मुख्यालयात भावपूर्ण निरोप



मा.श्री.अजय मेहता यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना मा.श्री.सुब्रत रथो

महानिर्मितीच्या स्थापनेपासून गेल्या सुमारे साडेतीन वर्षांपासून नवनिर्मित कंपनीला चेहरामोहरा प्राप्त करुन देण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावणारे महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.अजय मेहता यांना महानिर्मितीतर्फे मुख्यालयात नुकताच भावपूर्ण निरोप देण्यात आला. मा.श्री.मेहता हे आता महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत असणार आहेत. महानिर्मितीचे नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.सुब्रत रथो यांनी श्री.मेहता यांचेकडून पदाची सुत्रे स्वीकारली.

हाँगकाँग बँक इमारतीच्या मुख्यालयात दिनांक ६ फेब्रुवारी २००९ रोजी मासिक आढावा बैठकीत संपन्न झालेल्या या निरोप समारंभप्रसंगी मा.श्री.सुब्रत रथो, महापारेषणचे नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक मा.श्री.संजय सेठी, महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री.मधुकर शेलार, संचालक (वित्त) श्री.गुलाबसिंग गिरासे, कार्यकारी संचालक सर्वश्री चंद्रकांत थोटवे, व्ही. जी. देशपांडे, अरविंद चौधरी तसेच महानिर्मितीच्या मुख्यालयातील व क्षेत्रीय कार्यालयांतील मुख्य



मुख्य महाव्यवस्थापक (भुसावळ औ.वि.केंद्र) श्री.व्ही.एस. पाटील आपले प्रातिनिधीक मनोगत व्यक्त करताना

महाव्यवस्थापक व इतर अधिकारी उपस्थित होते. यापसंगी मा.श्री.अजय मेहता यांचा पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन सत्कार मा.श्री.रथो यांचे हस्ते करण्यात आला.

प्रारंभी संचालकवृंदाचे वतीने मा. श्री.गिरासे, मधुकर शेलार, चंद्रकांत थोटवे आणि अरविंद चौधरी यांनी मा.श्री.मेहता यांना पुष्पगुच्छ देऊन कृतज्ञता व्यक्त केली. पुनर्रचनेनंतर जी स्वाभाविक मरगळ जाणवत होती ती दूर करून मा.श्री.अजय मेहता यांनी कंपनीला साडेतीन वर्षांच्या



संचालक मा.श्री. मधुकर शेलार मनोगत व्यक्त करताना

(पुढील मजकूर पान २४ वर)